follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 * वर्ष २६ * अंक ३४६ * रविवार दि.१५ सप्टेंबर २०२४ * पाने ४ * किंमत ५/-

## आर्थिक कोंडीशी झुंजणाऱ्या एसटीकडून कर्मचाऱ्यांना आवाहन

**नागपूर :** आधी करोना व नंतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या संपामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळ आर्थिक कोंडीत सापडले आहे. कर्मचाऱ्यांना मूळ वेतनात वाढीचे आश्वासन देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महामंडळाने उत्पन्न वाढीसाठी क्लृप्ती शोधली आहे. त्यानुसार उत्पन्न वाढवणाऱ्या चालक-वाहकांना रोखीने प्रोत्साहन भत्ता दिला जाणार आहे.

२१ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर हा या योजनेसाठीचा कालावधी ठरवण्यात आला आहे. उत्पन्नाचे उद्दिष्ट निश्चित करताना आधी प्रत्येक फेरीतील महसुलाचा मूळ आकडा निश्चित करावा लागेल. यासाठी सप्टेंबर २०२३मधील सर्व दिवसांचे निव्वळ वाहतूक उत्पन्न (वाहकाने विक्री केलेल्या तिकिटांचे उत्पन्न) विचारात घेतले जाईल.

# धर्मवीर दिघेंच्या आनंद आश्रमात पैशांची उधळपट्टी

**मुंबई :** शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख दिवगंत आनंद दिघे यांच्या टेंभी नाक्यावरील आनंद आश्रमात शिंदेच्या शिवसेनेचे काही पदाधिकारी नोटा उधळतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. याप्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित पदाधिकाऱ्यांना पक्षातून काढून टाकण्यात येणार असल्याचं ते म्हणाले.

आनंद दिघे असते तर हंटरने फोडले असते?

स्व. आनंद दिघेंच्या घरात भिंतीवर एक हंटर लावलेला होता. काल आनंद आश्रमात झालेला धिंगाणा आनंद दिघेंनी पाहिला असता तर भिंतीवरील हंटर काढून त्यांनी लुटीचा पैसा उधळणाऱ्यांना फोडून काढलं असतं. जे स्वतःला आनंद दिघेंचा वारसादार मानतात, त्यांना आम्ही सांगू इच्छितो की, हा आनंद दिघेंचा वारसा नाही. आनंद दिघे अशाप्रकारच्या लोकांचे



कधीच समर्थन करत नसत. बारमध्ये ज्या प्रकारे पैसे उधळावेत, त्या पद्धतीने आनंद आश्रमात पैसे उधळले गेले, अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी केली.

वैभव नाईक यांची प्रतिक्रिया काय?

आश्रमात पैसे उडविणारे शिवसैनिक बारमध्ये जाणार होते, म्हणूनच त्यांनी त्यापद्धतीप्रमाणे पैसे उधळले, असा आरोप उबाठा गटाचे आमदार वैभव नाईक यांनी केली. स्व. आनंद दिघेंनी त्याकाळी बार फोडून सामान्य माणसाला न्याय दिला होता. पण त्याच दिघे साहेबांच्या आश्रमात बारप्रमाणे पैसे उडविले जाणे, हा दिघे साहेबांचाच अवमान आहे, अशीही टीका नाईक यांनी केली.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय म्हणाले?

**आनंदआश्रमतील प्रकरणावरून एकनाथ शिंदे म्हणाले, मी ते पाहिलं. त्याची चौंकशी होईल. ज्याने असा प्रकार केलाय त्याला पक्षातून काढून टाकणार. त्याच्यावर कारवाई करणार.**

### संजय राऊत काय म्हणाले?

**या राज्याच्या संस्कृतीला कलंकित करण्याचे काम हे सरकार करत आहे. पण ज्यांना गुरू मानले, त्यांनाही यांनी सोडलेले नाही. गुरूचीही अपकीर्ति यामाध्यमातून केली आहे. आनंद दिघेंना यांनी गुरू मानले असले तरी दिघेंनी यांना आपले शिष्य मानले होते का? बारमध्ये पैंसे उधळावेत, अशा प्रकारचे कृत्य आनंद दिघेंच्या आसनासमोर झाले. अशाच प्रकारचा पैंशांचा धिंगाणा राज्यभरात सुरू आहे. हा धिंगाणा फक्त लुटीच्या पैंशांतूनच केला जाऊ शकतो, कष्टाचा पैंसा असा उडवला जात नाही. पैंसे उडविणाऱ्यांची चौंकशी केली पाहीजे. त्यांच्याकडे एवढा पैंसा आला कुठून? याचा शोध घेतला पाहिजे, असं राऊत म्हणाले.**

**स्वतःला आनंद दिघेंचे चेले म्हणवून घेणाऱ्यांनी यावर भाष्य केले पाहीजे. दिघे साहेब असते तर भिंतीवचा हंटर आज नक्कीच खाली उतरला असता आणि एकेएकाला फोडून काढले असते, अशी टीका संजय राऊत यांनी केली.**

## खडसे यांच्या भवितव्याबाबत गणेशोत्सवानंतर निर्णय : देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण



**मुंबई:** भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्यासाठी प्रतीक्षेत असलेले ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांच्या भवितव्याबाबत केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतला असून तो आम्हाला मान्य असेल. त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया गणेशोत्सवानंतर करण्यात येईल, असे स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

मूळचे भाजपचे असलेले, मात्र कालांतराने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेलेले जेष्ठ नेते एकनाथ खडसे हे स्वगृही परतण्यासाठी दीर्घकाळ उंबरठ्यावर उभे आहेत. दिल्ली भेटीच्या वेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत आपला पक्षप्रवेश झाला असल्याचा खडसे यांचा दावा आहे. मात्र, पक्षाकडून अद्याप तशी कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही किंवा खडसे यांना अद्याप कोणतीही जबाबदारी देण्यात आलेली नाही.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या विरोधामुळे आपल्या पक्षप्रवेशाची घोषणा लांबवली जात असल्याचा आरोप खडसे यांनी यापूर्वी केला आहे. त्याचप्रमाणे फडणवीस यांनी आपल्याला राज्यपालपद बहाल करण्याचे आश्वासन दिल्याचा दावाही खडसे यांनी नुकताच केला आहे.

याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना फडणवीस म्हणाले की, खडसे नेमके काय म्हणाले ते मी ऐकले नाही. मात्र, त्यांच्या भवितव्याबाबत पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतला असून गणेशोत्सवानंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

ना घर का ना घाट का?

या पुढील काळात भाजप पक्षप्रवेशाबाबत आपण फुली मारण्याचा खुलासा खडसे यांनी नुकताच केला आहे. आपण चाळीस वर्ष निरपेक्ष भावनेने पक्षाचे काम केले. त्यासाठी हालअपष्टा सोसल्या. अपमान आणि चेष्टा सहन केली. बहुजन वर्गाला पक्षाशी जोडण्याचे काम केले. मला पुन्हा पक्षात घ्या हे मी त्यांना सांगितले नव्हते. त्यांच्याकडूनच पुन्हा परत या, असे आमंत्रण देण्यात आले होते. तरीही आपल्या पक्षप्रवेशाची घोषणा होत नसेल तर, मला पक्षात घ्या, अशी विनंती मी त्यांना करणे, माझ्यासाठी अपमानास्पद आहे, असे खडसे म्हणाले. आता भाजपा प्रवेशाची वाट बघण्यापेक्षा पुन्हा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काम जोमाने सुरू करणार, असेही ते म्हणाले. मात्र, खडसे यांच्यासाठी ही वाट ही सोपी असणार नाही. दुसऱ्या पक्षात प्रवेश मिळत नाही म्हणून पुन्हा आपल्या पक्षात येणाऱ्या नेत्यांच्या निष्ठा तपासून पहा, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे स्थानिक नेते राज्यातील पक्ष नेतृत्वाला बजावत आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात परतल्यानंतर तरी खडसे यांना कितीसा सन्मान प्राप्त होणार, हा एक प्रश्नच आहे.

## कोलकाता बलात्कार प्रकरणी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्यासह पोलीस निरीक्षकाला अटक

### पुराव्याशी छेडछाड केल्याचा आरोप



कोलकाता येथील आर.जी.कर वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर तरुणींच्या बलात्कार आणि हत्याप्रकरणी सीबीआयने महाविद्यालयाचे माजी प्राचार्य संदीप घोष तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजीत मोंडल यांना अटक केली आहे. दोघांनी साक्ष आणि पुराव्याशी छेडछाड तसेच तपास भरकटवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. याप्रकरणी सीबीआयने आतापर्यंत तिघांना अटक केली आहे.

'द इंडियन एक्सप्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, माजी प्राचार्य संदीप घोष यांना सीबीआयने २ सप्टेंबर रोजी महाविद्यालयातील भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली ताब्यात घेतले होते. ते सध्या तुरुंगात आहेत. त्यांना आता डॉक्टर तरुणींच्या बलात्कार आणि हत्याप्रकरणीही अटक करण्यात आली आहे. तर संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित मोंडल यांना शनिवारी पोलिसांनी चौकशीसाठी बोलवले होते. सात तासांच्या चौकशीनंतर त्यांनाही पोलिसांनी रात्री उशीरा अटक केली. दोघांनाही रात्री उशीरा वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापूर्वी सीबीआयने याप्रकरणातील मुख्य आरोपी संजय रॉय यालाही अटक केली आहे.

सीबीआयच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तलाल पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित मोंडल यांना शनिवारी चौकशीसाठी बोलवल्यानंतर त्यांनी उडवाउडवीची उत्तर दिली. या प्राथमिक तपासात त्यांनी पुराव्याशी छेडछाड केल्याचं तसेच गुन्हा नोंदवून घेण्यास विलंब केल्याचं आढळून आलं. याशिवाय याप्रकरणी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्यांचीही चौकशी केली जात होती. त्यांनीही पुराव्याशी छेडछाड केल्याचं आढळून आलं.

याप्रकरणी दोघांनाही रात्री उशीरा अटक करण्यात आली. तसेच त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांना आज सियालदाह येथील विशेष न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. खरं तर ९ ऑगस्ट रोजी डॉक्टर तरुणीच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर देशभरात संताप व्यक्त केला जातो आहे. तसेच दोषींना फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी डॉक्टरांकडून आंदोलन सुरू आहे. या आंदोलकांनी कोलकाताचे पोलीस आयुक्त विनित गोयल यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे.

## लोकसभा निवडणुकीतील फटका भरून काढण्याचे प्रयत्न

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीत कांद्याने महायुतीच्या डोळ्यात पाणी आणले. त्याची पुनरावृत्ती राज्यातील विधानसभा निवडणुकीत होऊ नये यासाठी केंद्र सरकारने कांदा, सोयाबीन उत्पादकांसह बासमती तांदूळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे या तिन्ही पिकांची निर्यात सुलभ आणि फायदेशीर ठरणार आहे.

केंद्र सरकारने कांद्याच्या खुल्या निर्यातीला परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे निर्यात शुल्क ४० टक्क्यावरून २० टक्के वर आणण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कांद्याच्या निर्यातीत वाढ होऊन स्थानिक बाजारपेठेतही कांद्याचे दर वाढणार आहेत. त्याचा फायदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना होणार आहे.

तसेच केंद्र सरकारने कच्च्या खाद्य तेलावर २० टक्के आयात शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत कच्च्या तेलावर कोणतेही आयात शुल्क नव्हते. त्याचप्रमाणे रिफाइंड तेलावरील आयात शुल्क साडे बारा टक्क्यावरून साडे बत्तीस टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे. त्यामुळे देशांतर्गत तेल उत्पादनाला प्रोत्साहन मिळून सोयाबीनला चांगले भाव मिळणार आहेत.

## अंतराळ हे आपले आवडते ठिकाण : सुनीता विल्यम्स

### अध्यक्षपदासाठी मतदान करण्यास अंतराळवीर उत्सुक



**वॉशिंग्टन :** नासाच्या स्टारलाइनर या अंतराळयानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांचा अंतराळातील मुक्काम वाढल्यामुळे जगभरातील संशोधक आणि अंतराळवीरांचे चाहते चिंतेत असताना हे अंतराळवीर कणखर मनाने अंतराळात राहत आहेत. इतकेच नव्हे तर अंतराळ हे आपले आवडते ठिकाण आहे, असे सुनीता यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून पृथ्वीवरील पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठी होणाऱ्या निवडणुकीत अंतराळातून मतदान करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचेही दोन्ही अंतराळवीरांनी नमूद केले.

अंतराळ हे आपले आवडते ठिकाण आहे. त्यामुळे येथील मुक्काम वाढल्याची खंत नाही. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक येथे राहणे आनंद देणारे आहे. गरज पडल्यास येथे आम्ही आठ ते दहा महिने ही राहू शकतो. मात्र, आम्हाला आपले कुटुंब आणि पाळीव प्राण्यांची तीव्रतेने आठवण येत आहे, असे सुनीता विल्यम्स यांनी सांगितले.

बुच यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील आपला दिनक्रम उलगडून दाखवला. बुच हे चार वाजता उठतात तर सुनिता साडेसहा वाजता उठतात. अंतराळात राहिल्यामुळे हाडांची घनता कमी होऊ नये यासाठी दोघेही दोन तास व्यायाम करतात. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात आपला मुक्काम एवढा वाढेल, अशी अपेक्षा नव्हती.

## महाराष्ट्र काँग्रेसमधील वाद आता दिल्ली दरबारी

**नागपूर :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र काँग्रेसमधील वाद वाढत असल्याने पक्षश्रेष्ठीने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांना शनिवारी दिल्लीत बोलावून घेतले.

काँग्रेसच्या चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी काही दिवसांआधी वडेट्टीवार यांच्या मतदारसंघात कुणबी समाजाच्या कार्यक्रमात वडेट्टीवारांचे प्रत्यक्ष नाव न घेता यांच्याविरुद्ध वक्तव्य केले होते. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही अल्पसंख्य आपल्यावर राज्य करीत आहेत. आता परिवर्तनाची वेळ आली आहे, असे त्या म्हणाल्या होत्या. वडेट्टीवार यांनी याबाबत पक्षश्रेष्ठीकडे तक्रार केली होती. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी पटोलेंसह धानोरकर आणि वडेट्टीवार यांना दिल्लीला शनिवारी पाचारण केले. वडेट्टीवार व धानोरकर यांच्यात चंद्रपूर जिल्ह्यात राजकीय वर्चस्वाची लढाई सुरू आहे. खासदार बंडू धानोरकर यांच्या अकाली निधानानंतर प्रतिभा धानोरकर यांनी चंद्रपूर लोकसभेवर दावा केला होता तर त्याचवेळी वडेट्टीवार यांनी त्यांची मुलगी शिवानीसाठी जोर लावला.

तेव्हापासून या दोन नेत्यांमध्ये मतभेद वाढत गेले आणि धानोरकर यांनी केलेल्या वक्तव्याने ते अधिक गंभीर झाले. त्यामुळे पक्षक्षेष्ठींनी त्यांना बोलावून घेतल्याचे समजते.



## सांगली महापालिकेला रोज एक लाख रुपये दंड

### कृष्णा नदी प्रदूषण प्रकरणी कारवाई

**सांगली :** सांगलीतील कृष्णा नदी प्रदूषणास कारणीभूत ठरल्याबद्दल प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून महापालिकेला दररोज एक लाख रुपये दंड सुरू असून, तशी नोटीस मंडळाकडून महापालिकेला बजावण्यात आली आहे. आतापर्यंत नदी प्रदूषणाबद्दल महापालिकेला करण्यात आलेला दंड ३३ कोटींवर पोहचला आहे.

शेरीनाल्यातून सांडपाणी कृष्णा नदीत मिसळते. याचा परिणाम म्हणून नदीतील जलचर प्राण्यांचे जिवीत धोक्यात आले आहे. गेल्या वर्षी प्रदूषित पाण्यामुळे कृष्णा नदीतील हजारो मासे मृत झाले होते. या प्रकरणी स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील फराटे यांनी हरित न्यायालयात धाव घेतली होती.नदी प्रदूषणाबद्दल महापालिकेला जबाबदार धरून दररोज एक लाख रूपये दंड ठोठावण्यात येत असल्याची नोटीस नियंत्रण मंडळाने नुकतीच महापालिकेला बजावली आहे. आतापर्यंत दंडाची रक्कम ३३ कोटींवर पोहचली आहे.

**प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव**

दरम्यान, याबाबत आयुक्त शुभम गुप्ता यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, की शेरीनाल्यातील प्रदूषित पाणी रोखण्यासाठी आणि दूषित पाणी शुद्ध करून शेतीवापरासाठी प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव असून, यासाठी ९४ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला आहे. हा प्रकल्प अहवाल शासनाला पाठविण्यात आला असून, तो मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. हा प्रकल्प राबविण्यात आल्यानंतर नदी प्रदूषणाचा मुद्दा निकाली निघेल.

# विभारतीय पुरातत्व विभागाच्या दिल्लीतील पथकाकडून पन्हाळगडाची पहाणी

## जागतिक वारसा स्थळांच्या अनुषंगाने केली पहाणी

**पन्हाळा :** राज्य शासनाने मराठा लष्करी किल्याचे जागतिक वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी जागतिक वारसा स्थळाचे पथक येत्या ऑक्टॉबर महिन्याच्या पाच तारखेला पन्हाळगडाला भेट देणार आहे. त्या अनुषंगाने पन्हाळागडावरील ऐतिहासिक महत्त्व सांगणाऱ्या इमारतींच्या पुरातत्व खात्याकडून चालू असलेल्या डागडूजीची पाहणी करण्यासाठी दिल्लीतील भारतीय पुरातत्व विभागाचे अतिरिक्त महानिदेशक जान्हविच् शर्मा यांचे सह पाच जणांचे पथक पन्हाळगडावर आले होते.



या पाहणी दरम्यान अतिरिक्त महानिदेशक जान्हविच् शर्मा यांचे बरोबर अधीक्षक पुरतात्वित शुभा मजुमदार, भारतीय पुरातत्व विभागाचे शेख मुहीब, दास, विजय चव्हाण, बाबासाहेब जंगले व इतर कर्मचारी यांनी पन्हाळगडाची पाहणी करुन माहिती घेतली यावेळी गडाचे मुख्य प्रवेशद्वार असलेला चार दरवाजा, येथील दोन्ही तलाव,धान्यकोठार,तीन दरवाजा,सज्जाकोठी या ऐतिहासिक वास्तूंची माहिती घेत पाहणी केली. व या ठिकाणांची डागडुजी करून नैसर्गिक बाज कसा अबाधित राखता येईल या बाबत अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच गडाचे मध्यवस्तीत असलेल्या धर्म कोटी या वास्तूची खात्याकडून चालू असलेल्या डागडूजीची पाहणी करून सूचना दिल्या.तसेच यावेळी घेतलेल्या भेटी दरम्यान त्यांनी गडावर अस्तित्वात असलेल्या पुरातत्व विभागाच्या नियमात कोणताही बदल होणार नसलेचे सांगितले.

# तर समाजातील अनेक प्रश्न आपोआप सुटतील : अनंत विष्णु

**मुंबई :** दारूबंदी करून मोफत आरोग्य व शिक्षण तसेच कर्जमुक्त शेतकरी व्यवस्था निर्माण केली तर समाजातील अनेक प्रश्न आपोआप सुटतील. मात्र सरकारची तशी मानसिकता दिसत नाही. असे स्पष्ट मत जय महाभारत पक्षाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष अनंत विष्णु यांनी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

संपूर्ण महाराष्ट्रात दारू बंदी . गृहलक्ष्मी योजनेअंतर्गत महिलांना निवारा, इंधनाला पर्याय म्हणून गोबर गॅस योजना, उत्तम मोफत शिक्षण. अजून रुग्णालये बांधून मोफत उत्तम वैद्यकीय सेवा आणि औषधे देण्यासाठी आमच्या पक्षाने नियोजनबद्ध कार्यक्रम आखला आहे. त्यासाठी महाराष्ट्रात सर्व ठिकाणी उमेदवार उभे करण्यात येणार आहेत असे अनंत विष्णु यावेळी म्हणाले.

सर्व नद्या जोडून शेतीसाठी पाण्याची व्यवस्था, शेतकऱ्याऱ्यांना किमान आधारभूत किंमत, शासकीय कृषी उत्पन्न बाजार समितीची वेगळी आखणी, सर्वसामान्य नागरिक व खास करून सैनिकांच्या कुटुंबीयांना कोणत्याही सरकारी कामासाठी सरकारी कार्यालयात जावे लागणार नाही. अशी व्यवस्था करण्यासाठी पक्ष तयारीला लागला आहे असे अनंत विष्णु यांनी सांगितले.

# पंधराशे रुपयांनी नाती निर्माण होत नाहीत

## सुप्रिया सुळेंची खोचक टीका

तासगाव : पैसा, सत्ता येते आणि जाते, पण टिकतात फक्त नाती. पण काहींना नाती कळली नाहीत. बहिणी लोकसभा निकालानंतर लाडक्या झाल्या. पंधराशे रुपयांनी नाती निर्माण होत नाहीत. पण या नात्यावरूनदेखील महायुतीत श्रेयवाद होतोय, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदारसुप्रिया सुळेयांची सत्ताधाऱ्यांवर टीका केली.



सावळज (ता. तासगाव) येथे दिवंगत चंद्रकांत पाटील यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरणसुप्रिया सुळेयांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार सुमनताई पाटील, रोहित पाटील, जिल्हा बँकेचे संचालक सुरेश पाटील, महांकाली कारखान्याच्या अध्यक्षा अनिता सगरे आदींची उपस्थिती होती.

सुळे म्हणाल्या, चंद्रकांत पाटील यांच्यासारख्या कार्यकर्त्यांमुळेच आर. आर. पाटील यांच्यासारख्या नेत्यांचे हात बळकट झाले. राज्यात नवीन चेहरा म्हणून रोहितकडे आपण पाहतोय. राज्यातील सर्वांत मोठी पोलिस भरती आर. आर. पाटील यांच्या काळात झाली. नेतृत्व हे संघर्षातूनच निर्माण होते. एक वर्षापूर्वी पक्ष नेला आणि चिन्हही नेले. पण पांडुरंगाने तुतारी चिन्ह आम्हाला दिले. तुतारी आज वाडी-वस्तीवर पोहोचली आहे.

पैसे, सत्ता येते जाते, पण टिकतात फक्त नाती. पण काहींना नाती कळली नाहीत. अशी टीका करून सुळे यांनी बहिणी लोकसभा निकालानंतर लाडक्या झाल्या. पैशाने नाती निर्माण होत नाहीत. पण या नात्यावरूनदेखील महायुतीत श्रेयवाद होतोय. आपले सरकार नक्की येणार, असा आशावादही यावेळी व्यक्त केला.

जयंत पाटील म्हणाले, आर. आर. पाटील यांचे जवळचे नेते म्हणून चंद्रकांत पाटील यांच्याकडे पाहिले जाते. चिकाटी व एका एका मताची कदर करणारा नेता व पूर्ण मतदारसंघ माहीत असलेला परिपक्व माणूस, लोकांशी प्रचंड एकनिष्ठ होता. त्यांच्या जाण्याने नुकसान झाले. मात्र, येथील लोक सागर पाटील यांना पाठबळ देतील. गडचिरोलीतील लोकांच्या मागणीनुसार निवडणुकीनंतर सहाच महिन्यांत आर. आर. आबांचा पुतळा तिथे उभा करायचा आहे.

रोहित पाटील यांनी यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचा पहिला आमदार हा या तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघातून असेल, असा विश्वास व्यक्त केला. प्रारंभी माजी जिल्हा परिषद सदस्य सागर पाटील यांनी प्रास्ताविक केले. ताजुद्दीन तांबोळी यांनी आभार मानले.

# हडपसर हांडेवाडी चौकात केले भाजप पक्षाने आंदोलन

**हडपसर :** समाजामध्ये दुफळी माजविणाऱ्या आणि हिंदूंच्या भावना दुखावणाऱ्यांवर केंद्र आणि राज्य सरकारने कडक कारवाई केली पाहिजे. स्वार्थासाठी व राजकारणासाठी हिंदू धर्मियांच्या भावना व हिंदू धर्माच्या व्रत वैकल्याचा वापर करणाऱ्यांवर तातडीने कारवाई झाली पाहिजे यासाठी हडपसर भागात हांडेवाडी चौकात भाजप पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र आंदोलन करत जाहिर निषेध व्यक्त केला.



कोल्हापुरमध्ये संभाजी ब्रिगेडच्या कार्यक्रमामध्ये श्री प्रभू रामचंद्र यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याबद्दल, शिवसेने(उबाठा)चे संजय राऊत यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बद्दल अपशब्द वापरल्याच्या निषेधार्थ हांडेवाडी चौक येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी तथाकथित लेखक ज्ञानेश महाराव यांनी हिंदू धर्मियांच्या भावना दुखावणारे वक्तव्य केले, त्यांचा बोलविता धनी शरद पवार आहे असे कार्यकर्त्यांचे म्हणणे असून यांचा जाहीर निषेध करण्यात आला.

यावेळी भाजप पदाधिकाऱ्यांनी व सकल हिंदू समाजाने नागरिकांचे घोषणा देत लक्ष वेधून घेतले.

पंचायत राज व ग्रामविकास मध्य हवेलीचे अध्यक्ष संदीप झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार अशोक टेकवडे, जालिंदर कामठे बाबाराजे जाधवराव, शासन नियुक्त सदस्य स्नेहल दगडे, राजेंद्र भिंताडे, संदीप हरपळे, धनंजय कामठे, सचिन हांडे, सुरज बिरे, संदीप परदेशी, अमोल औताडे, सागर खुटवड, सचिन जोशी उपस्थित होते.

# चाचणीसाठी आलेली पहिली वंदे भारत कोल्हापूरहून पुण्याला रवाना झाली

**कोल्हापूर :** येथून पुण्याला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे सोमवारी (दि.१६) उद्घघाटन होणार असले तरीही शनिवारी चाचणीसाठी आलेली ही ...



कोल्हापूर : येथून पुण्याला जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचे सोमवारी (दि.१६) उद्घघाटन होणार असले तरीही आज शनिवारी चाचणीसाठी आलेली ही वंदे भारत सकाळी १० वाजून २५ मिनिटांनी पुण्याला रवाना झाली. सोमवारी दुपारी सव्वा चार वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री सोमण्णा यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम निश्चित झाल्यामुळे शनिवारी चाचणी घेण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला. त्यानुसार सकाळीच भगव्या रंगाची वंदे भारत कोल्हापुरात दाखल झाली. यानंतर १० वाजून २५ मिनिटांनी ती पुण्याला रवाना झाला.

यावेळी रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी इंदूराणी दुबे, ब्रिजेश सिंह, मिलिंद हिरवे, डॉ. रामदास भिसे, विकास श्रीवास्तव, महेश्वरी, कोल्हापूर स्टेशन प्रबंधक मेहता, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य शिवनाथ बियाणी उपस्थित होते. या एक्सप्रेसबद्दल छत्रपती शाहू महाराज रेल्वे टर्मिनसवरील प्रवाशांनाही मोठी उत्सुकता होती.

# तासगावची सीट आल्यात जमा

## जयंत पाटलांनी आरआर आबांच्या रोहितला स्पष्टच सांगितल

**तासगाव :** राज्यात विधानसभा निवडणुकांची काही दिवसातच घोषणा होणार असून सर्व पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. आज सांगली जिल्ह्यातील तासगावमध्ये एका पुतळ्याच्या अनावरण कार्यक्रमात 'राष्ट्रवादी शरदचंद्र पवार' पक्षाच्या खासदारसुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्षजयंत पाटीलउपस्थित होते. यावेळी पाटील यांनी रोहित पाटील यांचा विधानसभेला विजय निश्चित असल्याचे म्हणाले. यामुळे रोहित पाटील यांनी महाराष्ट्रातही फिरले पाहिजे, विरोधकांमध्ये आणि रोहित पाटील यांच्यात मोठा फरक असणार असंहीजयंत पाटील म्हणाले.

प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी तासगाव विधानसभा मतदारसंघातून रोहित पाटील पाटील यांचा विजयाबाबत भाष्य केले. रोहित पाटील यांना महाराष्ट्रात प्रचारासाठी फिरण्याबाबतही भाष्य केले, यामुळे आता विधानसभा निवडणुकीत रोहित पाटील राज्यात प्रचारासाठी दौरा काढणार असल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आरआर पाटील आबा यांनीही पक्षासाठी याआधी प्रचारसभा घेतल्या होत्या. आबांच्या सभांना राज्यभरातून मोठी मागणी होती. रोहित पाटील यांचीही आरआर आबांसारखीख भाषण करण्याटची पद्धत आहे, त्यामुळे रोहित पाटील यांना निवडणूक काळात राज्यातून मोठी



मागणी असल्याचे बोलले जात आहे.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील बोलताना म्हणाले, आता राज्यात वातावरण बदलले आहे. रोहितदादांनी सांगितले की राष्ट्रवादीचा पहिला आमदार तासगाव मतदारसंघातून निवडून येणार आहे. आणि आलाच पाहिजे. डोळे झाकून तो निवडून येईल, तुम्ही आता महाराष्ट्रातही वेळ द्यायला हरकत नाही. कारण तुमच्यात आणि विरोधकांच्यात फार अंतर आहे, तुम्ही त्याची काही चिंता करु नका. तुमची सीट मोजल्यात जमा आहे, त्यामुळे आपल्या सगळ्यांना माझी विनंती आहे की, आपला पक्ष वाढवण्यासाठी महाराष्ट्रात फिरले पाहिजे, असंही जयंत पाटील म्हणाले.सुमन ताईंना अनेकांचा फोन आलाआपल्या पक्षातून बरीच लोक बाहेर गेली, काही लोक गेल्यानंतर सुमनताईंना किती फोन येत होते, किती दबाव होता मला माहित आहे. त्या दबावाला बळी पडल्या नाही, त्यांनी पवार साहेब जिथे असतील तिथे आम्ही असणार असं सांगितलं.

# सातारा शहरातील वर्दळीचे मार्ग दोन दिवस वाहतुकीसाठी बंद

**सातारा :** दिनांक १७ व १८ सप्टेंबर रोजी गणेशोत्सवानिमित्त सातारा शहरातून सार्वजनिक अडीचशे गणेशोत्सव मंडळांच्या गणरायाचे विसर्जन होणार आहे. त्यामुळे दिनांक १६ ते १८ या दोन दिवसांमध्ये शहरातील प्रमुख वर्दळीचे मार्ग जड वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत अशी माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिली आहे.

यामध्ये राजपथावर कमानी हौद, देवी चौक, मारवाडी चौक, मोती चौक वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत. कमानी हौद ते शेटे चौक कर्मवीर भाऊराव पाटील पथावर शेटे चौक ते मोती चौक, मोती चौक एमएसईबी ऑफिस ,समर्थ टॉकीज राधिका टॉकीज चौक ऐक्य प्रेस, बुधवार नाका चौक गणेश विसर्जन कृत्रिम तलाव, करंजे पेठेतील आंदेकर चौक ते करंजे पेठ पर्यंत येणारा मार्ग तसेच स्टेट बँक प्रतापगंज पेठ डीसीसी बँक मोती तळ्यापर्यंत येणारे मार्ग, मोळाचा ओढा ते बुधवार नाका मार्गावरील शाहूपुरी पोलीस ठाणे ते बुधवार नाकापर्यंत येणारे मार्ग हे सर्व वाहनांसाठी बंद राहणार आहेत.

बोगदा ते शाहू चौक हा मार्ग अवजड वाहनांसाठी बंद राहणार आहेत. बोगदा, समर्थ मंदिर, चांदणी चौक, मार्गे एसटी स्टँड साताराकडे येणारी वाहने चांदणी चौक राजवाडा मार्गे न येता समर्थ मंदिर अदालत वाडा शाहू चौक मार्गे एसटी स्टँड कडे जातील. मोळाचा ओढा कडून सातारा शहरात येणारी सर्व वाहने ही मोळाचा ओढा महानुभाव मठ करंजे भूविकास बँक चौक मार्गे मार्गस्थ होतील. कोटेश्वर मंदिर राधिका टॉकीज चौक राधिका रोड मार्गे एसटी स्टँडला जाणारी वाहने कोटेश्वर मंदिर शाहूपुरी मोळाचा ओढा मार्गे महानुभाव मठ ,करंजे, भूविकास बँक मार्गे एसटी स्टँड कडे जातील. मोती चौकाकडे जाणारी वाहने शाहू चौक आदालत वाडा मार्गे समर्थ मंदिरकडे जातील.

# राज्यभरात ३५९ दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची चौकशी सुरू



## दिव्यांग कल्याण आयुक्तांचा आदेश

**सांगली :** कथित आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिच्या दिव्यांग प्रमाणपत्रामधील बोगसगिरी उजेडात आल्यानंतर महाराष्ट्रभरात चौकशी सत्र सुरू झाले आहे. दिव्यांगांसाठीच्या राखीव जागेवर नोकरी मिळविलेल्या ३५९ उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसा आदेश दिव्यांग कल्याण आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

यासंदर्भात 'दिव्यांग कल्याण मंत्रालय दिव्यांगांच्या दारी' अभियानाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी शासनाकडे चौकशीची मागणी केली होती. राज्यभरातील कथित बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची यादी त्यांनी शासनाला दिली असून, त्यामध्येसांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील काही कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. बोगस उमेदवारांमुळे दिव्यांगांवर अन्याय होत असून, ते नोकरीपासून वंचित राहत आहेत, त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या धर्तीवर दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीसाठी मध्यवर्ती समिती स्थापन करण्याची मागणी कडू यांनी केली आहे.

कडू यांनी १९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान राबविले होते, त्यातून शासकीय व निमशासकीय विभागांत ३५९ बोगस उमेदवार आढळले आहेत. ही यादी त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे दिली. त्यानुसार आयुक्तांनी यादीतील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राच्या चौकशीचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

### साताऱ्यात १२, कोल्हापुरात आठ संशयित प्रमाणपत्रे

बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाला सादर केलेल्या यादीनुसार सातारा जिल्ह्यात १२, कोल्हापूर जिल्ह्यात आठ व सांगली जिल्ह्यात पाच दिव्यांग शासकीय व निमशासकीय सेवेत आहेत. त्यांची दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे बोगस असल्याचा संशय आहे. कृषी, महसूल, उपप्रादेशिक परिवहन, आदी विभागांत ते कार्यरत आहेत.

शासकीय, निमशासकीय विभागांत गेल्या काही वर्षांत दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दिव्यांगांसाठीच्या सवलतींचा ते लाभही घेत आहेत. त्यांच्या कायमस्वरूपी दिव्यांग प्रमाणपत्रांविषयी शंका येण्यासारखी स्थिती आहे.

# हातकणंगलेत ताराराणी पक्षाच्या जयश्री कुरणे यांची उमेदवारी

**कोल्हापूर, दि. १४ (वृत्तसंस्था) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इचलकरंजीचे अपक्ष आमदार प्रकाश आवाडे यांनी राजकीय खेळी करीत महायुतीवर दबाव आणायला सुरुवात केली आहे. यातून त्यांनी शुक्रवारी हातकणंगले राखीव मतदारसंघात पंचायत समितीच्या माजी सभापती जयश्री जयवंत कुरणे यांची उमेदवारी जाहीर केली आहे.



गेल्या विधानसभा निवडणुकीत ताराराणी पक्षाकडून अपक्ष निवडून आलेले आमदार आवाडे यांनी भाजपला पाठिंबा दिला. महायुतीच्या उमेदवारीत अडथळे येत असल्याने त्यांनी जिल्ह्यातील विधानसभेच्या चार जागा लढवण्याचे जाहीर केले आहे. इचलकरंजीत सुपुत्र जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राहुल आवाडे यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर त्यांनी आज जयश्री कुरणे यांचे नाव समोर आणले आहे.

हेर्ले (ता. हातकणंगले ) येथील कुरणे यांनी राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. क्षितिज सामाजिक संस्थेच्या संस्थापिका, महिला राजसत्ता आंदोलनाच्या पश्चिम महाराष्ट्र समन्वयक असलेल्या कुरणे यांनी पंचायत राज विभाग, जल जीवन मिशन, राजकीय विकास नेतृत्व येथे प्रशिक्षक म्हणून काम केले आहे.


मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सामानगड, गगनगड किल्ले राज्य संरक्षित स्मारक

## दोन महिन्यांत हरकती मागविल्या





**कोल्हापूर** : गडहिंग्लज तालुक्यातील सामानगडआणि गगनबावडा तालुक्यातील गगनगड हे दोन्ही किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने याबाबतच्या प्राथमिक अधिसूचनेचा प्रस्ताव शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाकडे पाठवला आहे. ही अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर हरकती घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. याबाबत गुरुवारी शासन आदेश निघाले.

सामानगड किल्ला राजा भोज दुसरा यांनी १२ व्या शतकात बांधला. सन १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला. विविध लढायांसाठी आवश्यक साधनसामग्री ठेवण्यासाठी प्रामुख्याने या किल्ल्याचा वापर होत होता. त्यामुळे सामानगड असे नाव पडल्याचे सांगण्यात येते. छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांची भेट या किल्ल्यावर झाल्याचे सांगण्यात येते. हा किल्ला संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्र १२.९६ हेक्टर आर इतके आहे.

शिलाहार राजा भोज दुसरा यांनी इ.स. ११७५ ते १२०९ पर्यंत गगनगडावर राज्य केले. पन्हाळा ही त्यांची राजधानी होती.कोल्हापूरपरिसरात एकूण १५ किल्ले त्यांनी बांधले. सिंधन यादव यांनी सन १२०९ मध्ये राजा भोज यांचा पराभव करून गगनगड किल्ला ताब्यात घेतला. सन १३१० मध्ये देवगिरीचा पाडाव झाल्यानंतर हा किल्ला दिल्लीच्या, त्यानंतर बहामनी व नंतर आदिलशाहीच्या ताब्यात हा किल्ला होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १६५८ मध्ये गगनगड जिंकून घेतला. हा किल्ला संरक्षित करावयाच्या स्मारकाचे क्षेत्र ४.०१ हेक्टर आर इतके आहे.

### या समावेशामुळे काय होते?

**हे किल्ले राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित झाल्यानंतर या ठिकाणच्या वास्तू, परिसर संवर्धन करण्यासाठी पूरक स्थिती निर्माण होते. तसेच यामध्ये आधुनिक पद्धतीप्रमाणे बदल करता येत नाही. थोडक्यात, या परिसराला शासकीय संरक्षण लाभते.**



# सांगलीसाठी दोन स्वतंत्र 'वंदे भारत' धावणार

**सांगली** : गणेशोत्सवाच्या काळात सांगली व कोल्हापूरकरांसाठीरेल्वेने आनंदाची बातमी दिली आहे. गेला आठवडाभर अनेक वादविवादांनंतर रेल्वे मंत्रालयाने कोल्हापूर ते पुणे व हुबळी ते पुणे अशा दोन स्वतंत्र वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा कंदील दिला असून, १६ सप्टेंबरपासून त्या धावतील. या निर्णयानंतर प्रवासी संघटनांनी आनंद व्यक्त केला.

हुबळी ते पुणे व पुणे ते हुबळी वंदे भारत एक्स्प्रेसला मंजुरी मिळाल्यानंतर रेल्वेने अचानक या मार्गात बदल करून याच गाडीला कोल्हापूरचा थांबा दिला होता. मात्र, वळसा घालून प्रवास होणार असल्याने त्यात प्रवासाचा वेळ अडीच ते तीन तासांनी वाढणार असल्याने कर्नाटक व महाराष्ट्रातील आमदार, खासदारांनी अशा मार्गास विरोध केला. त्यातच सांगलीचा थांबा रद्द केल्यानंतर सांगलीच्या नागरिक जागृती मंचने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मेलद्वारे तक्रार करत काळे झेंडे दाखविण्याचा इशारा दिला होता.

पंतप्रधान कार्यालयाने याची दखल घेत रेल्वे मंत्रालयाला आदेश दिले. त्यानंतर कोल्हापूर व हुबळीसाठी दोन स्वतंत्र वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा कंदील देण्यात आला. सायंकाळी रेल्वेचे कोचिंग विभागाचे संचालक संजय नीलम यांनी दोन्ही एक्स्प्रेसचे वेळापत्रक जाहीर केले.

# वित्त विभागाच्या अटी डावलून कारखान्यांना कर्ज देणार

## बंधपत्रातील जाचक अटी थेट वगळल्या



**कोल्हापूर** : राज्यातील आर्थिक अडचणीतील सहकारी साखर कारखान्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून शासन हमीवर मुदती कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी वित्त विभागाने घातलेल्या अटी शासनानेच मंगळवारी शिथिल केल्या. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर काही करून या अडचणीतील कारखान्यांना मदत व्हावी या हेतूने संचालकांना कायदेशीर बाबींची पूर्तता करून द्यावे लागणारे बंधपत्र शासनाने रद्द केले व आता फक्त बंधपत्र सादर करावे लागणार आहे.

सहकार विभागाने १३ सप्टेंबर २०२३ला अडचणीतील कारखान्यांना कर्ज देण्यासंबंधीचा आदेश काढला होता. त्यामध्ये कायदेशीर बाबींची पूर्तता करून बंधपत्र द्यावे व वैयक्तिक मालमत्तेवर कायदेशीर बाबींची पूर्तता करून बोजा चढवण्यात यावा, अशा महत्त्वाच्या अटी होत्या. त्यामुळे कर्ज थकले तर कारखान्याच्या संचालकांची मालमत्ता लिलाव करण्याचे अधिकार राज्य बँकेला मिळणार होते. त्यास कोणत्याच कारखान्याचे संचालक तयार नव्हते. त्यामुळे कारखान्याच्या अध्यक्षांची अडचण झाली होती.

शासन हमीवर राज्य बँक उपलब्ध करून देणारे कर्ज कारखान्याला उचलता येत नव्हते. त्याबद्दल साखर कारखानदारीकडून राज्य सरकारवर अटी बदलण्याचा दबाव होता. त्याची नोंद घेऊन शासनाने अखेर या अटी शिथिल केल्या. आता कर्ज वितरणापूर्वी बंधपत्र आणि कर्ज व व्याजाच्या परतफेडीकरिता संपूर्ण संचालक मंडळ वैयक्तिक आणि सामूहिकरीत्या जबाबदार राहतील, असे बंधपत्र सादर करावे लागेल. ते कायदेशीर नसल्याने कारखान्याने कर्जाची परतफेड केलीच नाही तर त्यामुळे अध्यक्ष किंवा संचालक मंडळ त्यास व्यक्तिगतरीत्या जबाबदार राहणार नाही.

यापूर्वीही राज्य बँकेने साखर उद्योगाला दिलेली कर्जे थकीत राहिली आहेत. ही रक्कम सुमारे साडेपाच हजार कोटींपर्यंत असल्याची सांगण्यात येत होते. या रकमेच्या वसुलीसाठी राज्य बँक सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेली. न्यायालयाने तज्ज्ञांची समिती नेमून ही रक्कम निश्चित करण्याचे आदेश दिले, त्यानुसार ती २७०० कोटी निश्चित झाली. ही रक्कम शासनाला राज्य बँकेला द्यावी लागली. तसे पुन्हा पुन्हा होऊ नये यासाठीच कडक अटी घालण्यात आल्या होत्या.

जुनी देणी भागवण्यासाठीच..

या कर्जातून कारखाने शेतकरी हिताचे काही नवीन करणार नाहीत. उसाची बिले, कामगारांचा थकीत पगार, व्यापारी देणी, थकलेली दीर्घ मुदतीची कर्जे यांचीच परतफेड करणार आहेत.

# कोल्हापुरात पर्यावरणपूरक विसर्जनास खो ; पंचगंगा नदीत थेट मूर्ती विसर्जन

कोल्हापूर : पंचगंगा नदी घाटावरील बॅरिकेड्स हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी हटविल्याने गुरुवारी (दि. १२) नदीतील वाहत्या पाण्यात भक्तांनी मोठ्या प्रमाणावर मूर्ती विसर्जन केले. निर्माल्य दान चळवळीस मात्र चांगला प्रतिसाद मिळाला. महापालिका आणि अवनि संस्थेच्या महिला दान केलेले निर्माल्य संकलित करीत होत्या. रात्री उशिरापर्यंत पंचगंगा घाटावर गणपती विसर्जनासाठी भक्तांची मोठी गर्दी उसळली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याचा अखंड जयघोष आणि पारंपरिक वाद्य, ढोल-ताशांचा गजर यामुळे नदी घाट दुमदुमून गेला होता.

प्रदुषणामुळे गेली अनेक वर्षे पंचगंगा नदीतील मूर्ती विसर्जन बंद झाले होते. त्यात महापालिका प्रशासन नदीत मूर्ती विसर्जनावर बंदीच घालत असल्याने प्रदूषण रोखण्यास मदत होती; परंतु यंदा निवडणुका असल्याने महापालिका व पोलिस प्रशासनानेही कोणतीच भूमिका घेतली नाही. लोक जे करतात ते करू दिल्याचे चित्र नदी घाटावर दिसले. परंतु



त्यामुळे कष्टपूर्वक रुजलेली मूर्ती दान, पर्यावरणपूरक विसर्जनाची चळवळ मागे केली.

महापालिका आणि पोलिस प्रशासनाने नदी घाटावर बॅरिकेड्स लावून कृत्रिम कुंडातच भक्तांनी मूर्ती विसर्जन करावे आणि वाहत्या पाण्यात मूर्ती विसर्जित करू नये, अशी व्यवस्था करण्यात आली होती. या नियोजनाप्रमाणेच विसर्जन होण्यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात होता. दरम्यान, दुपारी दीडच्या सुमारास काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी बंदोबस्तासाठी थांबलेल्या पोलिसांच्या समोरच बॅरिकेड्स उचकटून नदीच्या दिशेने जाणारी वाट खुली करून दिली. प्रशासनाने यास कोणताही विरोध केला नाही. नंतर याच कार्यकर्त्यांनी घाट परिसरातील कृत्रिम कुंडही काढले. परिणामी भक्तांनी पंचगंगा नदीतील वाहत्या पाण्यात मूर्ती विसर्जित केल्या. सकाळी नदीतील स्वच्छ असलेले पाणी सायंकाळी मूर्ती विसर्जनानंतर दूषित झाल्याचे दिसत होते.

### महापालिकेची यंत्रणा हतबल

**दान केलेल्या मूर्ती आणि निर्माल्य एकत्रित करण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी नदी घाटावर तैनात होते. पण मूर्ती दान करण्यासाठी काहिली किंवा कृत्रिम कुंड कोठेही नसल्याने वाहत्या पाण्यात मूर्ती सोडण्याची इच्छा नसणाऱ्या भक्तांची गैरसोय झाली. त्यांना नाइलाजास्तव वाहत्या पाण्यातच मूर्ती सोडाव्या लागल्या. बहुतांशी भक्तांनी स्वत:हून निर्माल्य दान केले. ते निर्माल्य संकलित करण्याची यंत्रणा महापालिकेने सक्षमपणे उभी केली होती.**

### मूर्ती दान करण्याचाही राखला 'मान'

**शहरातील रंकाळा तलावातील मुख्य कमानीजवळ भाविकांनी मोठ्या उत्साहात गणरायाला निरोप दिला. या ठिकाणी दुपारपर्यंत मूर्ती विसर्जनासाठी गर्दी होऊ लागली. महापालिकेच्या वतीने या ठिकाणी विसर्जन कुंडाची व्यवस्था करण्यात आली. परिसरातील राजे संभाजी तरुण मंडळाने विसर्जन कुंडाची व्यवस्था केली. संध्यामठाकडे विसर्जनासाठी जात असलेल्या भाविकांनी विसर्जन कुंडात मूर्तींचे विसर्जन करून मूर्तिदान उपक्रमाला प्रतिसाद दिला.महापालिकेच्या वतीने रात्री नऊ वाजेपर्यंत या ठिकाणाहून दोन हजारांहून अधिक गणेशमूर्ती दान करण्यात आल्या. त्यानंतर दहाहून अधिक ट्रॉलीतून निर्माल्य नेण्यात आल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सायंकाळी सहा नंतर मात्र या ठिकाणी भाविकांची प्रचंड गर्दी झाली.**



# कसबा बावड्यात पहिल्यांदाच रंगला भव्य रिंगण सोहळा

कोल्हापूर - कसबा बावडा इथं टाळ मृदंगाचा गजर, ग्यानबा तुकाराम हरिनामाचा जयघोष, भगव्या पताका अशा भक्तिपूर्ण वातावरणात भव्य रिंगण सोहळा रंगला. सम्राट मित्रमंडळ यांच्या वतीनं गणेशोत्सवानिमित्त दिंडी आणि रिंगण सोहळ्याचं आयोजन करण्यात आले होते.

गणेशोत्सवानिमित्त कसबा बावड्यातील सम्राट मित्र मंडळाकडून यंदा श्री क्षेत्र पंढरपूर, नामदेव पायरी अशी मंदिर प्रतिकृती तयार करण्यात आलीय. त्यानिमिताने मंडळाच्या वतीनं दिंडी आणि रिंगण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं.या सोहळ्यात बावड्यातील सुमारे दोनशे वारकरी सहभागी झाले होते. शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास चव्हाण गल्ली इथून दिंडीला सुरवात झाली. त्यानंतर दिंडी कसबा बावड्याच्या मुख्य रस्त्यावरून तुकाराम महाराज मंडप आणि ज्ञानेश्वर महाराज मंडप इथं थांबली. यावेळी वारकऱ्यांसह डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन महिलांही मोठ्या संख्येनं सहभागी झाल्या होत्या. टाळ-मृदंग आणि हरिनामाच्या गजरानं मुख्य रस्त्यावरील वातावरण भक्तिमय झालं होतं. रिंगण सोहळ्यातील उंट, घोडे, वारकरी,पालखी आणि विविध वेशभूषा केलेली बालकांची दिंडी हे आकर्षण ठरलं. अनेकांना पंढरीच्या वारीत सहभागी होता येत नाही. त्यामुळ पहिल्यांदाच आयोजित केलेल्या या रिंगण सोहळ्यात बावडेकरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष राहुल चव्हाण, उपाध्यक्ष नीरज चव्हाण यांच्यासह मंडळाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अतिवृष्टी, पुरामुळे पिकांचे ११ कोटींचे नुकसान

## शेतकऱ्यांना भरपाई मिळणार कधी?



**सांगली** : जिल्ह्यात जुलै महिन्यात झालेल्या धुवाँधार पावसामुळे मिरज, पलूस, वाळवा, शिराळा तालुक्यांतील सहा हजार १६७.४७ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे १० कोटी ९२ लाख ९ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी राज्य शासनाकडे पाठवला आहे. शासनाकडे नुकसानाचा अहवाल पाठवला असला, तरी शेतकऱ्यांना भरपाई कधी मिळणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हाधिकारी आणि कृषी विभागाने बुधवारी राज्य शासनाला अहवाल पाठवला आहे. अतिवृष्टी, कृष्णा, वारणा नद्यांना आलेल्या पुरामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. मिरज, शिराळा, वाळवा, पलूस तालुक्यांमध्ये भाजीपाला, पपई, सोयाबीन, भुईमूग, भात, हळद, मका, केळी आदी पिकांचे नुकसान झाले आहे.

यामध्ये चार तालुक्यांतील १६ हजार ९९९ शेतकऱ्यांचे सहा हजार १५९.२५ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना भरपाई देण्यासाठी १० कोटी ९२ लाख ९ हजार रुपयांची गरज आहे. यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा कृषी अधिकारी विवेक कुंभार यांच्या सहीने बुधवारी शासनाकडे पाठवला आहे.

सर्वाधिक फटका चार तालुक्यांमध्ये (क्षेत्र हेक्टरमध्ये)

तालुका - शेतकरी - संख्या क्षेत्र - नुकसान रक्कम

मिरज - ४०३२ - २५८८.९० - ४.४१ कोटी

वाळवा - ६१९३ - १६४९.०१ - ३.६० कोटी

शिराळा - ५५०२ - १७१८ - ३.९० कोटी

पलूस - १२७२ - २०३.३४ 0 - 0.३४ कोटी

कोणत्या पिकांचे नुकसान

मिरज : सोयाबीन, भाजीपाला, भुईमूग, ऊस, भात, मका, हळद, पपई, केळी.

वाळवा : सोयाबीन, भाजीपाला, भुईमूग, ऊस, भात, मका, हळद, पपई.

पलूस : सोयाबीन, भाजीपाला, ऊस, मका.

शिराळा : ऊस, भात.

### फळपिकांचे अत्यल्प नुकसान

**शिराळा, वाळवा, मिरज आणि पलूस तालुक्यांतील ३६ शेतकऱ्यांच्या आठ हेक्टर २२ गुंठे फळपिकांचे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांच्या भरपाईसाठी दोन लाख ३३ हजार रुपये निधीची गरज आहे. या निधीची मागणी शासनाकडे केली आहे.**

### अशी मिळणार भरपाई

**बाधित पिकाखालील शेतीला हेक्टरी १७ हजार रुपये तर फळपिकांना हेक्टरी २२ हजार ५०० रुपये शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे.**

# वडाच्या झाडावर विसावले गणपती बाप्पा

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**सांगली** : गुंडेवाडी (ता. मिरज) येथील जय हनुमान गणेशोत्सव मंडळाने वडाच्या झाडावर गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. वृक्षतोड थांबवून पर्यावरणाच्या संवर्धनाची संस्कृती ग्रामस्थांत रुजावी यासाठी गेल्या १५ वर्षांपासून मंडळ हा उपक्रम राबवत आहे.

डीजेमुक्त गणेशोत्सव, एक गाव, एक गणपती उपक्रम, झाडे लावा झाडे जगवा, असा संदेश मंडळ देत आहे. हा वेगळा उपक्रम पंचक्रोशीच्या आकर्षणाचा विषय बनविला आहे. वडावरच्या गणेशाच्या पूजेसाठी ग्रामस्थ गर्दी करतात. दररोज सकाळी व सायंकाळी आरतीला गावकरी एकत्र येतात. पाच हजार लोकवस्तीच्या या गावात गावातील तरुणांनी एकत्र येऊन ही अफलातून संकल्पना राबविली आहे. मंडप, सजावट, रोषणाई असा खर्च न करता वडाच्या झाडालाच गणेशाचे पूजास्थान बनविले. दोन फांद्यांच्या बेचक्यात जमिनीपासून २० फूट उंचावर मूर्तीचा स्थापना केली आहे.

गणेशोत्सव काळात दररोज हलगीच्या तालावर लेझीमसह पारंपरिक खेळ खेळले जातात. आरतीसाठी दोन कार्यकर्ते शिडीवरून झाडावर चढतात.

# कोल्हापुरातील शंभूराज पाटील भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी



**कोल्हापूर** : संभाजीनगर येथील शंभूराज शिवराज पाटील भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी रुजू झाले. त्यांची लेह लडाख येथे नियुक्ती केली. कोल्हापुरातील शंभूराज पाटील भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदीकोल्हापूर: संभाजीनगर येथील शंभूराज शिवराज पाटील भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी रुजू झाले. त्यांची लेह लडाख येथे नियुक्ती केली आहे. त्यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचे चेन्नई येथील अधिकारी प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण सुरू होते. त्याचा नुकताच संभाजीनगर फुटबॉल क्लबतर्फे सत्कार करण्यात आला.

शंभूराज यांचे शालेय शिक्षण छत्रपती संभाजीनगर येथे झाले. त्यानंतर ते शासकीय सैनिकी सेवा पूर्व शिक्षण संस्थेत (एसपीआय) रुजू झाले. त्यानंतर केआयटी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये पदवी घेतल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू केली. तो पहिल्याच प्रयत्नात २०२३ मध्ये उत्तीर्ण झाले. डिसेंबर २०२३ पासून चेन्नईत प्रशिक्षण सुरू होते. हा प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांची सप्टेंबर महिन्यात लेह लडाखमध्ये लेफ्टनंटपदी नियुक्ती करण्यात आली. शंभूराज यांचे वडील पुणे येथील एका कंपनीत सहायक सरव्यवस्थापक आहेत, तर आई डॉक्टर आहे.

# ड्रग्ज विक्री प्रकरणी दोघांना अटक;

## एलसीबीची कारवाई

कोल्हापूर - स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना कोल्हापूर राधानगरी रस्त्यावरील संकल्पसिद्धी कार्यालया जवळ एक व्यक्ती एमडीएम ड्रग्ज विक्रीसाठी घेवून येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून या ठिकाणी आलेल्या समीर उर्फ साजन गुलाब शेख याला ताब्यात घेतलं. चौकशीत त्यानं सांगली नाका इथं राहणारा पिस्तूल तस्कर कुख्यात गुंड मनीष नागोरी याच्याकडून ड्रग्ज घेऊन आल्याची माहिती दिली.

त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी मनीष नागोरीलाही अटक केली. पोलिसांनी शेख आणि नागोरी कडून १५ लाख ५१ हजार रुपये किंमतीचे १२ ग्रॅम एमडीएम ड्रग्ज आणि गुन्ह्यात वापरलेली एक चार चाकी जप्त केलीय. पोलीस निरीक्षक रवींद्र कळमकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मसुगटे, उपनिरीक्षक जालिंदर जाधव, महेश गवळी, अशोक पवार, अमित सर्जे, संतोष बर्गे, वैभव पाटील, विजय इंगळे, विनोद कांबळे, रोहित मर्दाने, शुभम संकपाळ आदींनी या कारवाईत सहभाग घेतला.

# प्रकाश बनकर विरुद्ध महेंद्र गायकवाड यांच्यातील कुस्ती बरोबरीत

## सह्याद्री कारखाना कार्यस्थळावर स्व. पी. डी. पाटीलसाहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त पार पडले मैदान

**मसूर** : दिवंगत पी. डी. पाटीलसाहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त सह्याद्री गणेशोत्सव मंडळ व सह्याद्री सहकारी साखर कारखाना यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना कार्यस्थळावर नुकत्याच पार पडलेल्या कुस्ती मैदानात अनेक नामवंत खेळाडूनी चटकदार कुस्तीचे प्रदर्शन घडविले. प्रथम क्रमांकाची कुस्ती गंगावेस तालीम कोल्हापूरचा उपमहाराष्ट्र केसरी पै. प्रकाश बनकर विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. महेंद्र गायकवाड यांच्यात लावली.

सदर कुस्ती माजी सहकार मंत्री, आमदार बाळासाहेब पाटील, युवा नेते जशराज पाटील यांच्या हस्ते व संचालक मंडळाच्या उपस्थितीत लावण्यात आली. तर पंच म्हणून छोटा रावसाहेब मगर यांनी काम पाहिले. या कुस्तीमध्ये सह्याद्रीचा प्रथम क्रमांकाचा मानकरी होण्याचा बहुमत कोणाला मिळतोय याची हजारो कुस्ती शौकिनांना उत्सुकता होती. परंतु मल्ल महेंद्र गायकवाड



**यशवंतनगर** : सह्याद्री कारखान्यावर आयोजित कुस्ती मैदानावर अंतिम कुस्ती उपमहाराष्ट्र केसरी प्रकाश बनकर विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड कुस्ती लावताना आमदार बाळासाहेब पाटील, कारखान्याचे संचालक जशराज पाटील व इतर मान्यवर.

यांच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाल्याने कुस्ती बरोबरीत सोडवत असल्याचा निर्णय पंचांच्या वतीने राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, सह्याद्रीचे चेअरमन आमदार बाळासाहेब पाटील यांनी घोषित केला.

दोन उपमहाराष्ट्र केसरी पैलवानांमध्ये २० ते २५ मिनिटे घमासान युद्धासारख्या चाललेल्या कुस्तीत डाव प्रतिडाव आणि एकमेकावर कब्जा घेण्याचा प्रयत्न सुरू असतानाच मल्ल महेंद्र गायकवाड गंभीर जखमी झाला. समयसूचकता

**मैदानात मान्यवरांची उपस्थिती.....**

- मैदानास भारत केसरी दीनानाथ सिंह, ऑलिंपिकवीर बंडा पाटील रेठरेकर, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, हिंदकेसरी संतोष वेताळ, नामदेव मोळे, उपमहाराष्ट्र केसरी चंद्रकांत सूळ, डबल उपमहाराष्ट्र केसरी बाळासाहेब पडघम, उपमहाराष्ट्र केसरी आबा सूळ, संपत जाधव, दादासाहेब थोरात कालवडे आदी मान्यवरांनी भेट दिली.

दाखवत माजी मंत्री आ.पाटील यांनी तातडीने डॉक्टरांना पाचारण केले. डॉक्टरांनीही तातडीने मैदानावर प्रवेश करत जखमी मल्लाच्या डोळ्यावर मलमपट्टी केली.

सदर मैदानात सुमारे ४०० च्या वर कुस्त्या लागल्या. उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत व राष्ट्रकुल विजेता आशिष हुड्डा यांच्यात अटीतटीची लढत झाली. या लढतीत किरण भगत यांने डंकी डावावर आशिषला आसमान दाखवत विजय मिळवला. तर रविराज चव्हाण विरुद्ध बिन्ना यांच्या प्रेक्षणीय कुस्तीने उपस्थितांच्याच्या डोळ्याचे पारणे फेडले. यामध्ये रविराजने गुणांवर विजय मिळवत बिन्नाच्या विरुद्ध मागील पराभवाचा उट्टा काढला. तर बाबासाहेब तालीम पुण्याचा मल्ल माऊली कोकाटे यांने चमकदार खेळ करत नेत्रदीपक विजय मिळवला. त्यानंतर इंटरनॅशनल पैलवान नामदेव कोकाटे, नाथा पवार, अक्षय जाधव, श्रीमंत भोसले, भूषण माळकर, मोईन पटेल, इंजमाम पटेल, मनोज कदम, स्वराज तामखडे, दादा शेळके, मुन्ना झुंजुर्गे, प्रशांत शिंदे, संदीप तनपुरे, प्रसाद सस्ते, शुभम कोळेकर, श्रीपाल हरयाणा या व इतर अनेक पैलवानांच्या अटीतटीच्या व प्रेक्षणीय कुस्त्या पहायला मिळाल्या. तसेच यावेळी ऑलिम्पिक पद्धतीच्या कुस्त्याही संपन्न झाल्या. सह्याद्रीचे संचालक मानसिंगराव जगदाळे, माणिकराव पाटील, संजय थोरात,पांडुरंग चव्हाण, लहुराज जाधव, रामदास पवार, सर्जेराव खंडाईत, पांडुरंग चव्हाण, जयवंत थोरात, संजय कुंभार, मंगेश पाटील, वसंतराव कणसे, डी.बी. जाधव, कांतीलाल पाटील, संदीप साळुंखे, जितेंद्र पवार, जालिंदर चव्हाण, प्रशांत यादव व जशराज पाटील मित्र परिवार यांनी कुस्त्या लावल्या आणि मैदान उत्कृष्ट पार पाडण्यासाठी सहकार्य केले.

कुस्तीचे समालोचक जोतीराम वाजे यांनी मैदानात उत्कृष्ट समालोचनाने रंगत आणली. त्यांना सह्याद्रीचे आर.जी.तांबे यांनी उत्कृष्ट साथ दिली.

दरम्यान यावर्षी सतत सुरू असलेल्या पावसामुळे कुस्तीमध्ये अडथळा येऊ नये यासाठी खबरदारी म्हणून यावर्षी सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे संचालक जशराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्ती मैदानावर पत्र्याचे शेड उभारण्यात आले होते. कुस्ती क्षेत्राला सन्मान मिळावा व ग्रामीण भागातील पैलवानांना मैदान व प्रेरणा मिळण्यासाठी सह्याद्रीवर कुस्त्यांचे मैदान आयोजित केल्याचे आमदार बाळासाहेब पाटील यांनी सांगितले.

सदर कुस्ती मैदानाला पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यातील मल्लांनी हजेरी लावली होती. तर कुस्त्या पाहण्यासाठी हजारो कुस्ती शौकिनांनी गर्दी केली होती. या मैदानाचे सह्याद्री कारखान्याचे संचालक जशराज पाटील तसेच सर्व संचालक, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

# आबदारवाडीत रक्षाविसर्जनाची राख पाण्यात न टाकता नवीन झाडाच्या बुद्यांला

**मल्हारपेठ** : आबदारवाडी गावातील ग्रामस्थ मृत्यूनंतर ही कुटुंबासह ग्रामस्थांना फळा फुलासह सावली देत आहेत. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे पाटण तालुक्यातील खेडोपाड्यात कौतुक होत आहे. गावातील कोणत्याही ग्रामस्थांचे निधन झाले की रक्षाविसर्जनाची राख नदीत किंवा पाण्यात न टाकता नवीन झाडासाठी खड्डा मारून ती रक्षा त्या खड्ड्यामध्ये टाकून मुजवली जाते व त्याठिकाणी नवीन झाड लावले जात आहे.

आदर्श ग्रामपंचायत आबदारवाडी आपल्या गावात नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याकरिता प्रयत्नशील असते. ''स्मृतीवृक्ष'' असाच एक पर्यावरण पूरक उपक्रम आपल्या गावामध्ये राबवून समाजात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. पर्यावरण पूरक उपक्रमाची संकल्पना पाटण तालुका शिवशाही सरपंच संघाचे अध्यक्ष व आबदारवाडी गावचे लोकनियुक्त सरपंच विजय शिंदे यांनी गावासमोर दोन वर्षापुर्वी मांडली. गावातील ग्रामस्थांनी या उपक्रमास संमती दर्शवल्यामुळे चांगल्या उपक्रमाची सुरुवात झाली.

गावातील एखादी व्यक्ती दिवंगत झाली तर त्यांच्या कुटुंबास ग्रामपंचायतीमार्फत कुटुंबाच्या आवडीचे एक फळा फुलाचे किंवा डोंगरी सावली किंवा जादा ऑक्सीजन देणारे झाड दिले जाते. संबंधीत कुटुंब मृत व्यक्तीच्या आठवणी करिता लावलेला वृक्ष हाच

**ग्रामपंचायतीचा स्मृतीवृक्ष असा पर्यावरणपूरक उपक्रम**



**आबदारवाडी** : गावातील शिंदे कुटुंब संपूर्ण परिवारासह स्मृती वृक्षाची लागवड करताना (छाया : अनिल वायदंडे, मल्हारपेठ)

> ग्रामपंचायतीने पर्यावरण पूरक उपक्रम राबविताना पाण्याचे प्रदूषण होवू नये. गावात झाडांची संख्या वाढविणे हाच उद्देश ठेवला असून गावातील ग्रामस्थांचा ही मोठा प्रतिसाद मिळत आहे. या स्मृतीवृक्षाची काळजी घेवून संबधीत परिवार आपल्या प्रियजणांची आठवण कायम स्वरुपी जपत आहेत.
>
> **– विजय शिंदे, सरपंच आबदारवाडी, अध्यक्ष, शिवशाही सरपंच संघ, पाटण**

- ग्रामपंचायतीमार्फत प्रेमविवाहास बळी पडून आपले आयुष्य वाया घालवू नये म्हणून गावातील तरुण मुलामुलींसाठी प्रबोधन पर व्याख्यान व दररोज ग्रामपंचायत वर बसलेला भोंगा वाजल्यानंतर घरातील टीव्ही संच बंद करून मुलांना अभ्यासाला बसवणे असे न करणाऱ्या कुटुंबास दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव ग्रामपंचायतीच्या वतीने घेण्यात आलेला आहे.

''स्मृतीवृक्ष'' म्हणून परिवार सांभाळ करत असून झाडाची काळजी घेवून वाढवत आहे.

स्मृती वृक्ष लावण्यासाठी संबंधीत कुंटबाच्या शेत बांधावर खड्डा मारला जात आहे. तर त्यांच्या मागणीनुसार नवीन झाड आणून दिले जात आहे. सुरवातीचा संपूर्ण खर्च ग्रामपंचायत करत आहे. वृक्ष जगविण्याची जबाबदारी त्या संबंधीत कुटुंबाची असून शेताच्या बांधावर लावलेली झाडे कुटुंबासह गावातील ग्रामस्थांना सावली व ऑक्सिजन देणार असून मोठे झाल्यानंतर फळे व फुले देणार आहेत. आपल्या प्रियजनांची आठवण म्हणून प्रत्येक ग्रामस्थ सहकार्य करत आहे. नदी किंवा पाण्याच्या प्रवाहात रक्षा विसर्जनाची राख टाकल्याने पाणी दूषित होते. अशा प्रकारचा उपक्रम आबदारवाडी गावाने राबवल्याबद्दल स्मृतीवृक्ष ह्या उपक्रमाचे तालुक्यासह वाडयावस्तीवरील ग्रामस्थांच्यातून कौतुक होत आहे.

# गणेशोत्सव सामाजिक बांधिलकीतून साजरा करावा : महेंद्र जगताप

## साकुर्डीत बाल हनुमान मंडळाकडून मोफत आरोग्य शिबिर

**कराड** : समाज एकत्रित यावा, एकजूट वाढावी आणि समाजातील गोरगरीब, दीनदुबळ्यांना मदत व्हावी. यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणपती उत्सव सुरू केला. आजही तोच विचार घेवून तरूण सार्वजनिक मंडळे आरोग्य शिबिरे राबवत आहेत. लोकांच्या आरोग्यासाठी मोफत प्रचार, प्रसार करण्यासोबत उपचार देत आहात ही कौतुकास्पद बाब आहे. गणेशोत्सव सामाजिक बांधिलकीतून साजरा केला जावा असे आवाहन कराड तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी केले.

मौजे साकुर्डी येथे गणेशोत्सावानिमित्त बाल हनुमान गणेश मंडळाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. के. एन. गुजर मेमोरियल हॉस्पीटल कराड यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व रोग निदान आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे



**साकुर्डी** : बाल हनुमान गणेश मंडळाच्या मोफत आरोग्य शिबिराचे उदघाटन पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप, डॉ. अमित ठिगळे, गणेश वेदपाठक, विश्वासराव निकम व इतर

उदघाटन पोलिस निरीक्षक महेंद्र जगताप, सरपंच अॅड. विश्वासराव निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुपने प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. अमित ठिगळे, डॉ. प्राजक्ता वठारे, डॉ. भुजंगराव पाटील, डॉ. सचिन पाटील, डॉ. एस. वाय. पाटील, डॉ. विद्या कांबळे, डॉ. अशितोष नांगरे, अभिषेक चव्हाण, संजय साठे, पीएसआय श्री. महाडिक, गणेश वेदपाठक, श्री. राजगे, मदनराव जाधव, निवासराव शिंदे, हणमंत डोंगरे, मसुनाथ रसाळ, शशिकांत मदने, मंडळाचे अध्यक्ष अशोक डोंगरे, शशिकांत सुर्वे, तंटामुक्तीचे अध्यक्ष सुहास पाटील, विशाल डोंगरे, सतिश निकम- पाटील, रमेश पाटील आदी उपस्थित होते.

सरपंच अॅड. विश्वासराव निकम म्हणाले, बाल हनुमान गणेश मंडळ दरवर्षा लोकांच्या आरोग्यासाठी राबवत असलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. लोकांना कोरोनापासून आरोग्याची काळजी घेण्याची सवय लागली आहे. परंतु, महागाईमुळे अनेकजण दवाखान्यात जाण्यास टाळाटाळ करतो. अशावेळी सामाजिक संस्था, गणेश मंडळांनी सामाजिक बांधिलकी म्हणून पुढाकार घेवून अशी मोफत आरोग्य शिबिरे राबविणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अॅड. विकास पाटील यांनी केले. आभार राहूल पाटील यांनी मानले.

# आवळाईच्या उपसरपंचपदी तृतीयपंथी दिलीप हेगडे यांची निवड

**आटपाडी** : आवळाई (ता. आटपाडी) येथील तृतीयपंथी दिलीप अण्णा हेगडे यांना पहिल्यांदाच उपसरपंच पदाचा सन्मान मिळाला आहे.



माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख व आमदार गोपीचंद पडळकर, अमरसिंह देशमुख, अनिल पाटील, भारत पाटील यांच्या नेतृत्वखालील पहिला तृतीयपंथी उपसरपंच बनण्याचा मान दिलीप हेगडे यांना मिळाला.

तृतीयपंथी यांना उपसरपंच पदी निवड करून आवळाई ग्रामपंचायतीने आदर्श निर्माण केला आहे.

हेगडे यांनी निवडीनंतर म्हणाल्या, ''या समाजातील वर्गाला मान सन्मान मिळत नाही. त्यांचाशी भेदभाव केला जातो. पण आवळाई ग्रामस्थांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. आवळाई ग्रामपंचायतीने एक आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी सरपंच गजेंद्र पिसे, दिलीप बोराडे, जयश्री दादासो शेंडे, प्रियांका समाधान वाघमारे उपस्थित होते.

# उंडाळे येथील दादासाहेब उंडाळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्ययालयात पर्यावरणपूरक सायकल रॅली

**उंडाळे** : येथील स्वातंत्र्यवीर दादासाहेब उंडाळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व एस. आर. दळवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरात पर्यावरण पूरक सायकल रॅली काढण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य बी. आर. पाटील, पर्यवेक्षक जे. एस. माळी यांनी रॅलीला ध्वज दाखवून रॅलीची सुरूवात केली. या रॅलीमध्ये सुमारे १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी एनसीसी विभागप्रमुख धनंजय पवार, एस. आर दळवी फाउंडेशनचे कराड तालुका सचिव शंकर आंबवडे, प्रदीप ओंबासे, रवींद्र भोये, बशीर



पठाण, सुरेश धाईगडे यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला. ही रॅली उंडाळे, खुडेवाडी, सावंतवाडी, मनू या गावातून सायकलवरून हे विद्यार्थी पर्यावरण विषयी जनजागृती करत फिरले. सायकलला विविध पर्यावरण पूरक स्लोगन लावलेले होते. यावेळी ठिकठिकाणी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या सायकल रॅलीचे उत्स्फूर्त स्वागत केले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

सायकल रॅली यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यामध्ये एन. सी. सी. चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

# भंगार गोळा करणाऱ्या महिलेने दहा तोळ्याचा सोन्याचा राणीहार केला परत

## प्रामाणिकपणातून दिली माणुसकीची प्रचिती : कराड शहर पोलिसांकडून सत्कार

**कराड** : घरात अठरा विश्व दारिद्र्य. हाताला काम नाही म्हणून 'ती' भंगार गोळा करायची. भंगार गोळा करता करता तिला नदीपात्रालगत तब्बल दहा तोळे वजनाचा सोन्याचा राणीहार सापडला. गणेश चतुर्थी दिवशी साक्षात समोर लक्ष्मीने दर्शन दिले मात्र प्रामाणिकपणा रक्तात असल्याने कोणत्याही लालसेला 'ती' बळी पडली नाही. तिने तिच्या ओळखीचा सोनार गाठला. सापडलेला हार सोन्याचा आहे का? याची खात्री केली आणि प्रमाणिकपणाचा उच्चांक गाठत तिने सोनाराला घेऊन तडक पोलिस स्टेशन गाठले. हा हार ज्यांचा आहे त्यांना परत करा अशी त्या महिलेने पोलिसांकडे मागणी केली. काही वेळातच संबंधित हाराचे मालक तिथे आले आणि त्या महिलेसमोरच तो राणीहार पोलिसांनी संबंधितांना दिला. हार मालकांनी महिलेच्या प्रामाणिकपणाला सलाम करत जागेवरच दहा हजार रुपयांचे रोख रक्कम बक्षीस म्हणून 'त्या' महिलेस दिले. माणसाची कितीही गरीब परिस्थिती असला तरी चालेल पण माणसाच्या



**कराड** : सोन्याचा हार परत करणाऱ्या नूरजहाँ फकीर व निसार सय्यद यांचा सत्कार करताना स.पो.नि. गणेश कड व सामाजिक कार्यकर्ते

मनाची श्रीमंती अपार असावी असे म्हटले जाते. अशा मनाने अपार श्रीमंत असलेली महिला म्हणजे नूरजहाँ फकीर. तिच्या या प्रामाणिक पणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. समाजात धनाने श्रीमंत असणारी माणसं पावला पावलावर भेटतात पण मनाने श्रीमंत असलेली नूरजहाँ ही लाखातच एखादी असते.

त्याचे झाले असे की, गोटे ता. कराड गावचे रहीवाशी अधिकराव दिनकर पवार हे आपल्या कुटुंबासमवेत हरतालिका मुर्ती विसर्जन करण्यासाठी ७ सप्टेंबर रोजी प्रितीसंगम घाटावर गेलेले. हरतालिका मुर्ती विसर्जन करते वेळी मूर्तीस १० तोळे वजनाचा ८ लाख ३० हजार रुपये किंमतीचा सोन्याचा राणीहार मूर्तीसोबत चुकून विसर्जन झाला. बरीच शोधाशोध करून पवार कुटुंबीयांना तो हार सापडला नाही. छत्रपती शिवाजी स्टेडियम पाठीमागे रहाणारी नुरजहाँ

- नुरजहाँ फकीर यांच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांना अधिक पवार यांनी दहा हजार रुपये रोख दिले व सोबत असणाऱ्या महीलांना साडी देवुन यथोचित सत्कार केला. तसेच महिला दुकानात आल्यानंतर तो हार सोन्याचा आहे हे महिलेला सांगितले व ही बाब पोलिसांना सुद्धा प्रामाणिकपणे कळवनाऱ्या सुपर ज्वेलर्सचे मालक निसार सय्यद यांचा सुद्धा पोलिसांनी सत्कार केला. यावेळी गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. तब्बल १० तोळ्यांचा सापडलेला रानिहार परत देणारी महिला नुरजहा फकीर व सुपर ज्वेलर्स चे मालक निसार सय्यद यांच्या प्रामाणिकपणाबद्दल दोघांचे कौतुक होत आहे.

फकीर ही महिला बुधवारी प्रितीसंगम घाट येथे नेहमीप्रमाणे भंगार गोळा करावयास गेली. भंगार गोळा करता करता त्या महिलेला राणीहार सापडला. त्यांच्या हाती १० तोळे वजनाचा सोन्याचा हार लागला होता मात्र त्यांनी ही बाब न लपवता सोन्याचा राणीहार त्यांचे ओळखीचे सोनार सुपर ज्वेलर्स चे मालक निसार सय्यद यांचेकडे आणुन दिला. निसार सय्यद यांनी ही घटना माजी नगरसेवक सिद्धार्थ थोरवडे यांना कळवली. निसार सय्यद व सिद्धार्थ थोरवडे यांनी त्या महिलेस तो हार तुम्हाला पाहिजे का? असे विचारले. मात्र नूरजहाँ यांनी मनाचा मोठेपणा दाखवत तो हार ज्यांचा असेल त्यांना द्यावा असे सांगितले. निसार सय्यद व सिद्धार्थ थोरवडे हे त्या महिलेसोबत कराड शहर पोलीस स्टेशन मध्ये गेले. त्यांनी तो १० तोळे वजनाचा सोन्याचा राणीहार पोलिसांकडे दिला. गुन्हे प्रकटीकरणचे गणेश कड यांनी अधिकराव पवार यांना बोलावुन घेवुन सोन्याचा राणीहार त्यांचाच असल्याची ओळख पटवली व हार त्यांच्या ताब्यात दिला.

# हेळगावच्या माईंची नात.... उच्च शिक्षणासाठी निघाली परदेशात

**मसूर** : कराड तालुक्यातील हेळगाव गावातील पवार कुटुंब.. घरची परिस्थिती बेताचीच असताना आपल्या चारही मुलांना उच्चशिक्षित करताना त्या दोघांनीही प्रचंड काबाडकष्ट केले. पांडुरंग पवार उर्फ आप्पा आणि लीलावती पवार उर्फ माई या नावाने गावातील सर्वजण त्यांना ओळखत होते. आज त्यां माईंची नात कुमारी रोहिणी रंगराव पवार हिची उच्च शिक्षणासाठी जगप्रसिद्ध अशा नॉटिंगम ट्रेंट युनिव्हर्सिटी इंग्लंड येथे नुकतीच निवड झाली आहे. आज आपल्या नातीची दैदिप्यमान प्रगती पाहायला अप्पा आणि माई नाहीत. मात्र माईंची नात उच्च शिक्षणासाठी निघाली परदेशात अशी चर्चा संपूर्ण हेळगावसह परिसरात आहे. तसेच रोहिणीच्या निवडीचा सार्थ अभिमान पवार कुटुंबासह संपूर्ण गावालाच आहे.



रंगराव पवार यांनी पोलीस मध्ये भरती होऊन एपीआय पदापर्यंत भरारी घेतली आहे. त्यांची कन्या रोहिणी हिने औषध निर्माण शास्त्र विषयात पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे.

रोहिणीचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सेंट अँड्रूस हायस्कूल पुणे येथे तर बी फार्मसीचे महाविद्यालयीन शिक्षण डॉक्टर डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट अँड फार्मासिटिकल सायन्सेस रिसर्च पिंपरी येथे पूर्ण केले आहे तर एम एस फार्मकोलॉजी या कोर्ससाठी तिची जगप्रसिद्ध अशा नॉटिंगम ट्रेंट युनिव्हर्सिटी इंग्लंड येथे निवड झाली आहे. तिचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.